
१९६५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चारित्र
सं. क्र. १७८




REFBK-0014434

विशाल मुंबई राज्य मंत्रीमंडळांतील

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38358 वि: चरित्र
क्रमांक 1216 नोंद दिन 23.3.55

—: एक तेजस्वी तारा :—



# ना. बाळासाहेब देसाई

REFBK-0014434

सार्वजनिक बांधकाम खात्याचे

कर्तबगार मंत्री, मुंबई राज्य.

यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण

—लेखक

# —: अनुक्रमणिका :—


* अर्पण पत्रिका १

* लेखकाचें निवेदन ३

* दोन शब्द
राजारामबापू ... ५

१ योगीयांचा योगीराजा
संत ज्ञानेश्वर ... ७

२ देवाचा लाडका
संत नामदेव ... १३

३ अनाथांचा नाथ
संत एकनाथ ... १८

४ संत शिरोमणी
तुकाराम महाराज २६

५ आमचे बापूजी ... ३०

६ आधुनिक संत
साने गुरुजी ... ३४

६ राष्ट्र संत विनोबाजी ३९

* थोरांचे अभिप्राय ४३



प्रकाशिका —
सौ. हिराबाई सि. रानगे
१७३५, राजारामपुरी ६ वी गल्ली
कोल्हापूर.


मुखपृष्ठ व आंतील चित्रें श्री. चंद्रकांत सूर्यवंशी यांचीं, डॉ. घाळींचें चित्र श्री. बाबुराव सुतार यांचें आणि सर्व ब्लॉक्स, उदय प्रोसेस वर्क्स, कोल्हापूर यांनीं तयार केले आहेत. तसेंच विद्वज्जनांचे अभिप्राय पुस्तकाचे शेवटीं आहेत.

मूल्य ८० नये पैसे


मुद्रकः—
श्री. गो. वा. कुलकर्णी,
सेवा मुद्रणालय, कोल्हापूर.

# लेखकाचें निवेदन —

साहित्य क्षेत्रांत या पुस्तकाच्या रुपानें पहिलें पाऊल टाकतांना माझें अंतःकरण हर्षातिशयानें उचंबळून येत आहे. आणि ज्या ज्या थोर सद्गृहस्थांनीं उदार अंतः-करणाने मुक्त हस्तें द्रव्यसाहाय्य केलें त्यांच्याबद्दल मी कृतज्ञ आहे.



डॉ. एस्. एस्. घाळी

अशा थोर सद्गृहस्थांपैकीं गडाहिंग्लज येथील सुप्रसिद्ध धन्वंतरी आणि दीनबंधू म्हणून ख्यातनाम असलेले डॉ. एस्. एस्. घाळी हे अग्रगण्य उपकारकर्ते होत.

डॉक्टरांच्या पुढें मी कोणतीहि अडचण सांगावी आणि डॉक्टरांनीं तितक्याच अत्मीयतेनें ती अडचण दूर करावी असें नेहमींच घडत आलें आहे. किंबहुना त्यांनीं गेल्या दहा वर्षांत माझ्यासाठीं जे परिश्रम घेतले आहेत त्यामुळेंच मी आज जिवंत आहे असें म्हटल्यास त्यांत यत्किंचितहि अतिशयोक्ति होणार नाहीं. डॉक्टरनीं जर या वेळीं द्रव्य साहाय्य देऊन प्रोत्साहन दिलें नसतें तर हें पुस्तक जनतेसमोर येऊंच शकलें नसतें.

त्याचप्रमाणें माझ्या जिवाभावाचे मित्र सर्वश्री अनंतराव आजगांवकर, एस्. एम्. खन्ना, लक्ष्मणराव चोरगे, बापूसो धुरे, आण्णा हळीज्वाळे, शंकर रणदिवे, अ. म्ह. मकानदार, बी. एस्. मूडबिद्रीकर, वसंत पानारी, शिवाय सर्वश्री बी. बी. करोशे, भि. आ. चौगुले आणि शि. नि. इंचनाळे आदि गुरुजीनीं द्रव्य-साहाय्य करून मला उपकृत केलें आहे.

जिल्हा विकास मंडळाचे मानद चिटणीस दिनकरराव मुद्राळे आणि श्रीमान बी. आर. शिंदे यांनीं हस्तलिखित प्रत वाचून कांहीं उपयुक्त सूचना केल्या हें नमूद करणें माझें कर्तव्य आहे.

या पुस्तकाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष व लोकनेते राजाराम बापू पाटील यांनीं सुंदर प्रस्तावना लिहून दिली व वाङ्मयीन क्षेत्रांत पदार्पण करतांना आशीर्वाद दिला हें मी माझें भाग्य समजतों.

त्याचप्रमाणें कोल्हापूर जिल्हा स्कूल बोर्डाचे ध्येयवादी चेअरमन श्री. दौलतराव निकम, जिल्हा विकास मंडळाचे चिटणीस श्री. दिनकरराव मुद्राळे, गोपाळ कृष्ण गोखले कॉलेजचे प्रोफेसर आणि कानडी अनेक पुस्तकांचे लेखक श्री. सच्चिदानंद शिरोडकर, कोल्हापूर जिल्हा स्कूल बोर्डाचे कर्तव्यनिष्ठ असिस्टंट ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर श्री. आर. आर. जाधव आणि ताराराणी अध्यापिका विद्यामंदिरचे उत्साही प्राध्यापक श्री. एम्. आर. राऊत यांनीं आपला कामाचा व्याप बाजूला ठेवून या पुस्तकाची हस्तलिखित प्रत वाचून अभिप्राय दिले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या पुस्तकाची मूळ कल्पना श्री मौनी विद्यापीठांतर्गत श्री. उदाजीराव अध्यापक भवनाचे माननीय प्राचार्य श्री. द. गो. दसनूरकर यांची मी ट्रेनिंगला असतांना त्यांनीं माझ्याकडून हस्तलिखित प्रत तयार करवून घेतली आणि ती मी सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ कर्ममूर्ति बा. ग. जगताप यांना दाखवली. बाबूरावजींनीं प्रोत्साहन देऊन माझ्यांत आत्मविश्वास निर्माण केला. यामुळेंच मी हें पुस्तक प्रकाशित करण्यास उद्युक्त झालों; म्हणून मी प्रिन्सिपॉल श्री. दसनूरकरसाहेबांचा व पू. बाबूरावजींचा ऋणी आहे.

खरें पाहिलें असता या पुस्तकांत माझें असें कांहीं नाहीं. जें आहे तें संतांचें आहे. तुकाराम महाराजांच्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं,

" फोडिलें भांडार । धन्याचा हा माल
मी तव हमाल भारवाही "

हें पुस्तक लिहितांना ज्या थोर साहित्यिकांच्या साहित्याचा उपयोग झाला त्यांचा आणि महाराष्ट्र ग्रंथ भांडारचे मालक व सेवा मुद्रणालयाचे सेवाव्रती मालक श्री. गो. वा. कुलकर्णी यांचा त्यांनीं दिलेल्या सहकार्याबद्दल अंतःकरणपूर्वक आभारी आहें.

शेवटीं सरकार, माझे सहकारी शिक्षक मित्र, विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमी जनता सक्रिय सहकार्य देईल अशी आशा व्यक्त करून तूर्त रजा घेतो.

**– सि. मा. रानगे.**

मुख्याध्यापक, उपतालुका शाळा, शिगणापूर.

# दोन शब्द

१४४३४



राजारामबापू पाटील

श्री. सि. मा. रानगे यांच्या 'सन्त परिचय' पुस्तकास दोन शब्द लिहितांना आम्हास आनंद होत आहे. बहूजन समाजांतील एका प्राथमिक शिक्षकानें भारतीय संतांचा अगदीं सोप्या सरळ भाषेंत परिचय करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

चांदण्या रात्रीं गच्चीवर मुलांनीं कोंडाळं करून बसावं किंवा निरक्षर अज्ञानी खेडुतांनं कडे चावडीच्या पारावर बसलेलं असावं व त्या ठिकाणीं अगदीं सोप्या त्यांच्या भाषेंत कहाणी सांगावी तसा प्रयत्न श्री. रानगे यांनीं आपल्या या पुस्तकांत केलेला आहे. लहान मुलांना गोष्ट सांगतांना आपण त्यांना समजेल अशा भाषेंत सांगतों. गोष्टींत अधूनमधून आश्चर्यकारक घटनांचा समावेश करतो. यामुळें त्याबद्दल उत्सुकता वाटते. तसेंच संतांच्या जीवनांतील महत्त्वाच्या घटनांचा मधूनमधून केलेला उल्लेख चांगलाच परिणामकारक झालेला आहे.

श्री. रानगे यांनीं दिलेल्या संतांचा परिचय यापूर्वी प्रसिद्ध झालेला असला तरी अगदीं सरळ मराठी बोल-भाषेंत तो दिल्यानें लहान मुलांना त्याचबरोबर प्रौढ साक्षरांना आवडेल अशी आम्हांस आशा वाटते. आचार्य विनोबाजी भावे, म. गांधी, साने गुरुजी या अलिकडच्या थोर व्यक्तींच्या प्रमाणेंच ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांचा दिलेला कथावजा परिचय चांगला लिहिलेला

आहे. म. गांधींची सत्यप्रियता, विनोबाजींची त्यागवृत्ति, याचबरोबर तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांच्याहि जीवनांतील महत्त्वपूर्ण घडामोडी देऊन लेखकानें संतांचें चित्र वाचकांच्या समोर हुबेहुब उभें करण्याचा प्रयत्न केलेला आहे. गुणात्मक व्यक्तिमत्त्व, प्रौढ साक्षर नि लहान मुलांच्या मनावर ठसेल, असें वाटतें. म. गांधी, तुकाराम, साने गुरुजी हे लेख जोडाक्षरांचा वापर न करतां लिहिण्याचा प्रयत्न उल्लेखनीय आहे.

या पुस्तकाकडे पाहातांना बहुजन समाजांतील ग्रामीण विभागांतील नवीन होतकरू तरुणानें भारतीय संतांचें चित्र वाचकांपुढें रेखाटण्याचा केलेला पाहिला प्रयत्न आहे व तो शुद्ध सरळ भावनेंतून केलेला आहे. या दृष्टीकोनांतून पाहावें अशी आमची या प्रसंगीं मराठी वाचकांना प्रेमाची सूचना आहे.

श्री. रानगे यांच्या प्रथम पुष्पाचें आम्ही हार्दिक स्वागत करतों व त्यांना **या प्रांतांत उज्ज्वल भविष्य इच्छून 'दोन शब्द' पुरे करतो**

आर. ए. पाटील ( राजारामबापू )
अध्यक्ष,
महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी.

# १. योगीयांचा योगीराजा




योगीयांत योगी–ज्ञानीयांत ज्ञानी आणि संतांत थोर संत म्हणून ज्ञानेश्वर महाराजांची थोरवी आहे. त्यांच्या पित्याचें नांव विठ्ठलपंत. ते आपेगांवचे कुलकर्णी होते. आळंदीचे कुलकर्णी सिधोपंत यांच्या रुक्मिणीबाई मुलीशीं त्यांचा विवाह झाला.

विठ्ठलपंतांचा पिंड संसारी माणसाचा नव्हता. ते सुरवातीपासूनच विरक्त होते. संसारांत त्यांचें मन लागेना. त्यांनीं मनाशीं बेत केला! नवतरुण पत्नीचा त्याग करून ते थेट काशीला गेले.

काशीला रामानंदस्वामी नांवाचे एक थोर संत होते. त्यांची त्यांनीं गांठ घेतली. विठ्ठलपंतांनीं त्यांना आपल्या हृदयाची तळमळ विदित केली, आणि आपल्याला संन्यास दीक्षा देण्याबद्दल प्रार्थिले. रामानंद स्वामींनीं विठ्ठलपंतांच्या ठिकाणीं असलेली भक्तिमार्गाची तळमळ पाहून त्यांना संन्यास दीक्षा दिली. थोर संन्याशाला कनवाळू शिष्य प्राप्त झाला.

काहीं दिवसानंतर रामानंद स्वामी तीर्थयात्रेला निघाले. फिरतां फिरतां एक दिवस त्यांचा आळंदीला मुक्काम होता. रुक्मिणीबाई अजानवृक्षाला प्रदक्षिणा घालीत होत्या. त्यांनीं रामानंदांना पाहिलें! बाईंनीं भक्तिभावानें स्वामींचें दर्शन घेतलें. स्वामींनीं रुक्मिणीबाईला आशीर्वाद दिला, "पुत्रवती भव!"

रुक्मिणीबाईला खटकलें. त्यांचा चेहरा पडला. त्या अधोमुख होऊन म्हणाल्या, "महाराज, माझ्या बाबतींत आपण दिलेला आशीर्वाद निष्फळ ठरणार आहे, कारण माझ्या पतीनें संन्यास दीक्षा घेतली आहे."

रामानंदांना चमत्कारिक वाटलें! त्यांनीं रुक्मीणीबाईकडून सर्व हकीगत ऐकून घेतली. झाला प्रकार त्यांना कळून आला. आपला नूतन शिष्य म्हणजेच या नवतरुणीचा पति हें त्यांच्या ध्यानीं आलें.

विवाहानंतर आपल्या पत्नीची परवानगी न घेतां कोणाहि विवाहित पुरुषाला संन्यास घेण्याचा अधिकार पोंचत नाहीं ही गोष्ट जाणून रामानंदांनीं तीर्थयात्रेचा बेत रहित केला. ते परत काशीला परतले.

विठ्ठलपंतांची त्यांनीं कानउघाडणी केली. विठ्ठलपंतांनीं आपली चूक कबूल केली, व स्वामींच्या चरणीं क्षमा मागितली. स्वामींनीं त्यांना क्षमा केली व परत गांवीं जाऊन संसार करण्याची आज्ञा केली.

विठ्ठलपंत आळंदीला आले. त्यांचा संसार सुरू झाला. पण आळंदीकरांना ही गोष्ट रुचली नाहीं. वर्णाश्रम धर्मांतील संन्यासाश्रम हा शेवटचा आश्रम असून तो स्वीकारून पुन्हां त्याचा त्याग केल्यानें व गृहस्थाश्रम स्वीकारल्यानें ते विठ्ठलपंतांची नालस्ती करूं लागले. पवित्र अशा संन्यासधर्माची विटंबना विठ्ठलपंतांनीं गृहस्थाश्रम स्वीकारून केल्यानें त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबियांचा भयंकर छळ तेथल्या ब्रह्मवृंदांनीं केला.

शके ११९५ मध्यें रुक्मिणीबाईंना निवृत्तिनाथ झाला. त्याच्या पाठोपाठ दोन दोन वर्षांच्या अंतरानें ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताबाई यांचा जन्म झाला.

मुलें वाढूं लागलीं, त्यांच्या मुंजींचा प्रश्न उभा राहिला! संन्याशाच्या पोटच्या पोरांच्या मुंजी कोणी व कशा करावयाच्या? विठ्ठलपंतांच्या कुटुंबियांवर आळंदीकरांनीं बहिष्कार घातला होता! त्यांना वाळीत टाकलें होतें!!

विठ्ठलपंतांनीं मुलांच्या मुंजी करण्यासाठीं सर्वांना विनविलें- भगीरथ प्रयत्न केला त्यांनीं. पण—पण कांहीं उपयोग झाला नाहीं. मुलांच्या मुंजी होऊंच शकल्या नाहींत.

मातापिता व मुलें यांची हेटाळणी होऊं लागली. त्यांना कोणी जवळ घेईना कीं त्यांच्या बरोबर आपुलकीचे दोन शब्द कोणी बोलेना! एखाद्या वणव्यांत सांपडलेल्या दुबळ्या प्राण्यांसारखी त्यांची अवस्था झाली.

विठ्ठलपंतांनीं आळंदीच्या धर्माधिकाऱ्यांना विनवून, झाल्या चुकीबद्दल क्षमा मागितली, पण हट्टाला पेटलेल्या धर्माधिकाऱ्यांनीं त्यांना क्षमा केली नाहीं. बिचारे विठ्ठलपंत! त्यांनीं प्रायश्चित्ताची मागणी केली. केवळ आपल्या चुकीसाठीं मुलांचा जन्म वाया जाऊं नये अशी विनवणी केली.

धर्माधिकाऱ्यांनीं एकमतानें निर्णय दिला, "या चुकीसाठीं विठ्ठलपंतांनीं व रुक्मिणीबाईंनीं देहांत प्रायश्चित्त घ्यावें; या प्रायश्चित्ताशिवाय शास्त्रांत दुसरें प्रायश्चित्त नाहीं."

दुर्दैवी विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई! चारहि बाळांना त्यांनीं कवटाळलें. त्यांच्यावर अश्रूंचा अभिषेक केला व थरथरत्या ओठांनीं त्यांचे मुके घेतले.

विठ्ठलपंत व रुक्मिणीबाईंच्या डोक्यावर वज्र कोसळल्यासारखें झालें होतें. या गोजिरवाण्या लाडक्या लेकरांना सोडून जाणें त्यांच्या जीवावर आलें होतें. पण करणार काय?

रात्र झाली, रातकिडे किरकिरूं लागले. चांदण्या आपल्या मंदावलेल्या डोळ्यांनीं पृथ्वीवरील प्रकार पाहूं लागल्या. जिकडे तिकडे रात्रीचा अंमल जारीनें झाला होता. काळोख मी म्हणत होता. त्या भकास व भीषण रात्रीं विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई आपल्या अंथरुणावर उठून बसल्या. त्यांच्या अंतःकरणांत कालवाकालव सुरू झाली होती. त्यांनीं आंसवांनीं भरलेल्या डोळ्यांनीं त्या प्रेमळ बाळांचा निरोप घेतला. त्यांचे पाय उचलतनासे झाले.

पण मनाविरुद्ध त्यांनीं मोठ्या कष्टानें घराबाहेर पाय टाकले. फिरून त्यांनीं देवाला नमस्कार केला व गंगेच्या वाटेला लागले.

क्षणाचाहि विचार न करतां मुलांचा जन्म वायां जातां कामा नये, या एकाच उदात्त गोष्टीसाठीं त्यांनीं–त्या पुत्रवत्सल मातापित्यांनीं–जलसमाधी घेतली. गंगेसारख्या पवित्र असलेल्या दोन पवित्र आत्म्यांनीं गंगेमध्यें स्वतःला लोटून दिलें !!

त्या वेळीं निवृत्तिनाथ अवघा दहा वर्षांचा होता. धर्ममार्तंडांना त्यानें आपल्याला जातींत घेण्याबद्दल नम्रपणें प्रार्थिलें; पण त्या कर्मठ व पाषाण-हृदयी ब्राह्मणांनीं आपल्या पाठीमागें लागलेली कटकट चुकविण्यासाठीं बोटभर चिठी देऊन त्या कोमलहृदयी कोंवळ्या बाळांना पैठणला धाडलें.

कमनशीबी निवृत्तिनाथ ! आपल्या लहान भावंडांना बरोबर घेऊन पैठणला गेला. तेथें त्यानें आळंदीकरांनीं दिलेली चिठी दाखवून आपणांला धर्मांत घेण्याबद्दल व मुंजी करण्यासाठीं विनविलें. पैठणच्या धर्मविशारदांनीं एकमुखीं निर्णय दिला, "मुलांनो, मुंजीच्या संस्कारानें तुम्हांला ब्राह्मण करून घेतां येणार नाहीं, तुम्ही संन्याशाचीं मुलें आहांत, तुमच्या वडिलांनीं संन्यासधर्माची विटंबना केली आहे."

"त्याबद्दल त्यांनीं देहांत प्रायश्चित्त घेतलें आहे" मध्येंच ज्ञानेश्वर बोलला.

"तरी पण तुम्ही त्यांच्या रक्तामांसाचे गोळे ना ?"

"म्हणजे आईबापांनीं जी शिक्षा भोगली तीच आम्हींहि भोगावी असें शास्त्रांत सांगितलें आहे का ?"

"बाबारे, आम्ही तुमचे शत्रू नाहीं. आजपर्यंत असें कधीं घडलेंच नाहीं. तेव्हां धर्मशास्त्रांत तसा कोठें उल्लेख नाहीं. आम्ही सारासार विचार करून आपणांला श्रीकृष्ण परमात्म्याची भक्ति करावयास सांगतों."

"पैठणचे धर्ममार्तंड हेंच सांगून आम्हाला देशोधडीला लावणार आहेत काय ? सर्वांभूतीं आत्मा एक आहे ही श्रीकृष्ण परमात्म्याची मानव-धर्माची व्याख्या तरी आपणांला मान्य आहे काय ?"

" ज्ञानेश्वरा, वेदान्त आणि व्यवहार यांत फरक आहे. शब्दश: अर्थ घेण्याचा आपण प्रयत्न केला तर मोठी अनवस्था निर्माण होईल ! बाहेर चाललेला रेडा व आपण यांच्या मधला आत्मा एकच आहे असें होईल !"

ज्ञानेश्वर चिडून बोलला, "होय, रेड्याचा आत्मा व आपला आत्मा एकच आहे !"

"तर मग त्या रेड्यालाहि बोलतां आलें पाहिजे! आपल्यासारखें त्याला बोलायला लावा पाहूं ?"

रेड्याला आणून ज्ञानेश्वरांपुढें उभें करण्यांत आलें! ज्ञानदेव मंत्र म्हणतांच रेडाहि मंत्रोच्चार करूं लागला! सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला!

धर्ममार्तंडांनीं ज्ञानदेवांच्या चरणांवर लोटांगण घातलें व त्यांना त्रिनदिक्कत विनाविलंब शुद्धिपत्र दिलें! येथून पुढचें ज्ञानेश्वरांचें आयुष्य परमात्म्याच्या चिंतनांत व्यतीत झालें. मूढांना त्यांच्या चुका अगर गैरसमजूत दाखवून देण्यासाठीं त्यांना कांहीं चमत्कार करून दाखवावे लागले.

एकदां काय झालें ! कोंवळें ऊन पडलें होतें. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई एका पडक्या वाड्याच्या भिंतीवर बसून उन्हांत शेकत होते. ज्ञानेश्वरांच्या अनेक चमत्कारांमुळें त्यांचें नांव सर्वांमुखीं झालें होतें. त्यावेळीं चांगदेव आपणा स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजत होता. त्यानें ज्ञानेश्वराला खजिल करण्याचें ठरविलें. तो वाघावर बसून हातांत सापाचा चाबूक घेऊन आला. ज्ञानदेवाला ही वार्ता कळली. चांगदेवाच्या मनांतला हेतु त्यानें ओळखला. आणि, तो भिंतीवर बसूनच भिंतीसह चांगदेवाच्या समोर गेला! चांगदेवानें निर्जीव भिंत चालत असलेली पाहून आश्चर्य व्यक्त केलें व तो लीनपणें ज्ञानदेवाच्या चरणीं लीन झाला.

असे अनेक चमत्कार करून दाखविल्यानंतर ज्ञानेश्वरानें आपल्या प्रेमळ भावंडांच्या समवेत व संतांच्या समवेत सर्व तीर्थयात्रा केली. त्यानें गीतेवर सर्वोत्कृष्ट टीका लिहिली ती 'ज्ञानेश्वरी' या नांवानें प्रसिद्ध आहे.

वेदप्रणीत जो धर्म गीतेंत संस्कृतमध्यें सांगितला होता तो त्यानें बहुजन समाजासाठीं प्राकृतमध्यें लिहून सुबोध केला. धर्मकल्पनेवरला गंज

त्यानें काढून टाकून दिव्यत्वाचें दर्शन ग्रंथाकरवीं सर्वांना घडविलें. ज्ञानेश्वरी-सारखा रसाळ ग्रंथ या अल्पवयीन पोरानें लिहून एक मोठाच चमत्कार केला आहे.

ज्ञानेश्वरानें भागवत धर्माचा पाया घातला. **'ज्ञानदेवें रचिला पाया । तुका झालासे कळस'**

पंढरीच्या वारीला व्यवस्थित रूप दिलें. इतकें प्रचंड काम झाल्यावर ज्ञानेश्वरानें जिवंत समाधी घ्यायचें ठरविलें. पंढरीच्या पांडुरंगापुढें त्यानें तसा आपला संकल्प जाहीर केला.

महाराष्ट्रांतील सर्व संत जमले. समाधीचा दिवस दिवसेंदिवस जवळ जवळ येऊं लागला. सर्वांचीं अंत:करणें सागरांतील लाटांप्रमाणें हेलावूं लागलीं. निवृत्तिनाथ, सोपान व मुक्ताबाई यांची स्थिति तर अत्यंत केविलवाणी झाली. मुक्ताबाईचे डोळे अक्षरश: ज्ञानदेवावर सारखे खिळून राहूं लागले.

ज्ञानेश्वर आळंदीला आले. इंद्रायणीच्या तीरावर अजानवृक्षाखालीं त्यांचें शेवटचें कीर्तन झालें. नामा, सावता, गोरोबा या सर्वांना गहिंवरून आल्यावांचून राहिलें नाहीं. कार्तिक वद्य त्रयोदशीला, गुरुवारीं मध्यान्हीं समाधिस्थानाकडे ज्ञानदेव आपल्या गुरूच्या–निवृत्तीच्या–बोटाला धरून चालले. असंख्य भक्तांचा कलिजा आज दृष्टिआड होणार होता म्हणून त्यांचीं तोंडें चिमणीसारखीं झालीं होतीं.

ज्ञानदेव समाधि-मंदिरांत जाऊन बसले. दोन्ही बाजूला समया तेवत होत्या. समोर ज्ञानेश्वरी होती. निवृत्तिनाथांनीं मोठ्या कष्टानें आपल्या हातानें शेवटची शिला लावली. ज्ञानदेव केवळ ज्ञानरूप उरला !

* *

# २. देवाचा लाडका



**श्री संत नामदेव**

ही भारतभूमि सन्तांची भूमि, महंतांची भूमि आहे. भारतांतील प्रत्येक मातीचा कण सन्तमहात्म्यांच्या उच्छ्वासानें पुनीत झाला आहे. भोगमय भूमि त्यागमय करण्याच्या कामीं संतांनीं फार मोठी कामगिरी पार पाडली आहे.

भारताच्या बहुविध भागांत सन्तमहात्म्यांनीं जन्म घेतला आहे. त्यांनीं सर्वसामान्य लोकांना परमार्थाच्या मार्गाला लावून मोक्षासिद्धीचीं दारें ठोठाविलीं आहेत.

भारतभूमीच्या सर्व भागांत भव्य नि पवित्र तीर्थक्षेत्रें असून जणू सर्व भारतच भक्तिभावानें डोलत आहे कीं काय असें वाटूं लागतें.

या सर्व संतमंडळींमध्यें देवाचा फारच लाडका जो सन्त नामदेव त्याच्याविषयींची माहिती आपण आज करून घेऊं.

हैद्राबादमधील नरसी बामणी या गांवांत दामाशेट नांवाचा एक भगवद्भक्त राहात होता. त्याच्या पोटीं सन्त नामदेवाचा जन्म झाला.

नामदेव बालपणीं बालभास्कराप्रमाणें अत्यंत तेजस्वी असून तो दिवसेंदिवस चंद्रकोरेप्रमाणें वाढत होता. तो नित्य आपल्या पित्याबरोबर विठ्ठल मंदिरांत जात असे.

एकदां असें झालें. वडील कांहीं कामासाठीं परगांवीं गेले. त्यांच्या गैरहजेरींत नामदेव देवपूजेला गेला. पूजा आटोपल्यानंतर त्यानें देवाला दुधाचा नैवेद्य दाखविला. त्यानें देवाला लडिवाळपणें दूध प्यावयास सांगितलें. पण देव दूध पिईना. नामदेवानें पुनः पुनः दूध पिण्यास देवाला विनविलें. शेवटीं देव दूध पिईना म्हणून तो रडकुंडीस आला; पण देव कांहीं दूध प्याला नाहीं.

आतां मात्र नामदेव चिडला. त्याचा राग अनावर झाला. त्यानें हातांत भली मोठी काठी घेतली आणि त्यानें देवाला दरडावून विनविलें, "देवा, लवकर दूध पी. नाहींतर या काठीनें तुला चांगलाच झोडपून काढीन !"

देव जणूं घाबरला ! तो दूध प्याला—नामदेवाचा आनंद गगनांत मावेना—त्याला आकाश ठेंगणें असें वाटूं लागलें.

नामदेव आतां बराच मोठा झाला होता—त्याच्या लग्नाचे बेत घरांत होत होते. तें नामदेवाला कळलें. त्यालाहि तें ऐकून बरें वाटलें ! कोणाला वाटेल आपलें लग्न होऊं नये म्हणून ?

नामदेवाचें लग्न ठरलें. वऱ्हाड आलें. मुंगी गर्दीनें माणसें लग्नाला जमलीं. पंढरीच्या पांडुरंगानेंच लग्नासाठीं द्रव्यसाहाय्य केलें असें म्हणतात !

लग्नानंतर नामदेव देवाला विसरला. आपल्या तरुण पत्नीच्या भोंवतीच चुळबुळ करूं लागला. तो विलासांत दंग झाला. त्याला वाईट लोकांची संगत लागली. मोह एकटाच माणसांच्या अंतःकरणांत निवास करीत नाहीं, तर तो आपल्या बरोबर अनेक साथीदारांना—विकारांना—विवश करून घेत असतो.

नामदेव चोऱ्या करूं लागला. दरोडे घालूं लागला. श्रीमंतांना लुटूं लागला. यात्रेकरूंच्यावरहि हल्ले चढवायला कमी केलें नाहीं. त्यानें अनेकांचे खून पाडले. जिकडे तिकडे त्याच्या नांवाचा बभ्रा झाला. सर्व लोकांना त्याची दहशत बसली. मात्र त्याचा एक नित्यक्रम असे. तो कधीं चुकायचा नाहीं. नामदेव रोज संध्याकाळीं आंवढ्या नागनाथाला जाई.

नामदेवाची ही अरेरावीची वृत्ति पाहून त्याच्यावर राऊत पाठविण्यांत आले. हल्लेप्रतिहल्ले झाले. त्यांत अनेक राउतांचे मुडदे पडले.

नित्याप्रमाणें एके दिवशीं तो आपल्या घोड्यावर बसून आंवढ्या नागनाथाला आला. देवळांत एक बाई आपल्या लहान बाळांना घेऊन रडत बसली होती. तिचा कारुण्यपूर्ण विलाप ऐकून नामदेवानें तिची चौकशी केली. बाईनें घडलेली सारी हकीगत त्याला सांगितली. तिचा पति नामदेवानें केलेल्या हल्ल्यांमध्यें बळी पडला होता.

हें ऐकून नामदेवाला फारच वाईट वाटलें. त्याला पश्चात्ताप होऊं लागला. त्यानें आपला घोडा व आपल्याजवळ असलेलें सारें द्रव्य दुसऱ्यांना देऊन टाकलें आणि आपल्या जवळच्या सुरीनें त्यानें आपल्या अंगावर वार करून घेतले. डोक्यांतून रक्ताच्या चिळकांड्या उडूं लागल्या. रक्ताची धार त्यानें पिंडीवर सोडली आणि आणि पंढरीचा रस्ता धरला.

रक्तानें त्याचें सर्वांग भिजलें होतें. माशा घोंगावत होत्या. पण त्यानें कसळीच फिकीर केली नाहीं. त्याच्या अंतरींची धांव पांडुरंगाच्या चरणीं धांवत होती.

नामदेव आतां पूर्णपणें निवळला होता. तो जगदीशाच्या चरणीं लीन झाला होता. सर्वांभूतीं आत्मा एकच आहे, अशी त्याची श्रद्धा झाली होती.

एकदां एक मजेदार गोष्ट घडली. नामदेवानें देवपूजा आटोपली. देवाला दाखविण्यासाठीं तो नैवेद्य शोधूं लागला; पण तो विस्कटलेला दिसला. नामदेवानें सभोंवार पाहिलें, एका कुत्र्यानें नैवेद्यासाठीं आणलेली

पोळी तोंडांत धरून पळ काढला होता. नामदेवाच्या दृष्टीस हें दृश्य पडल्याबरोबर तो कुत्र्याच्या पाठीमागें तुपाची वाटी घेऊन धांवूं लागला.

कुत्र्यानें कोरडी पोळी खाऊं नये! ती त्याला पचायला जड जाईल, असें त्या भगवद्‌भक्ताला वाटलें.

नामदेव हा देवाचा लाडका आहे! तो त्याच्याबरोबर बोलतो; प्रसंगीं देव त्याला मदत करतो! ही गोष्ट सर्वांमुखीं झाली होती. ज्ञानेश्वरांच्याबरोबर नामदेवहि तीर्थयात्रेला गेला होता. एके दिवशीं सर्व संत मंडळी गप्पा मारीत बसली होती. संतांच्या गप्पा कसल्या चालायच्या? देव, भक्त या विषयावरच ते चर्चा करीत होते. मुक्ताबाईचें लक्ष मात्र तिकडे नव्हतें. तिनें नामदेवाची गंमत करण्याचा बेत केला. त्या गोरोबांना म्हणाल्या, "काका, आमची मडकीं तपासणार आहांत ना? कोणाकोणाचीं मडकीं पक्कीं आहेत तें पाहा!"

गोरोबाकाकांनीं ही गोष्ट मोठ्या आनंदानें मान्य केली. त्यांचा तसा मोठा अधिकारच होता. त्या वेळच्या सर्व संत मंडळींत वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध तेच होते.

त्यांनीं थापटणी घेतली. निवृत्तीच्या डोक्यावर थापटण्यानें थोपटलें व त्याचें मडकें पक्कें आहे असें सांगितलें. ज्ञानदेवाचें मडकें तपासण्यांत आलें. तेंहि पक्कें असल्याचें त्यांनीं सांगितलें. सावता माळ्याचें मडकं पक्कें असल्याचा निर्वाळा त्यांनीं दिला. शेवटीं नामदेवाची पाळी आली. गोरोबांनीं नामाचें डोकें थापटलें. तो कळीसरसा मोठ्यानें किंचाळला. 'कच्चें रे कच्चें' असें म्हणून गोरोबा हंसूं लागला.

नामाला फारच वाईट वाटलें. त्याच्याकडे पाहून सर्वजण हंसत होते. तो चिडला. विठ्ठलाजवळ त्यानें आपलें गाऱ्हाणें सांगितलें. विठ्ठल खदखदून हंसूं लागला. नामदेवाचा चेहरा काळवंडला!

विठ्ठलानें नामदेवाला गुरु करण्याचा सल्ला दिला. तो म्हणाला, "नामदेवा, ज्ञानाशिवाय भक्ति व्यर्थ आहे. आणि ज्ञान गुरूशिवाय मिळणें

कसें शक्य आहे ? तूं विसोबाकडे जा आणि गुरूपदेश घे; म्हणजे तुला ज्ञान प्राप्त होईल."

नामदेव विसोबाच्या शोधासाठीं नागनाथाच्या मंदिरांत गेला. त्याला तेथें एक विलक्षण म्हातारा दिसला. म्हाताऱ्याचे दोन्ही पाय पिंडीवर होते व तो आडवा पडलेला होता. त्याला पाहून नामदेवाच्या रागाचा पारा चढला. त्यानें त्या म्हाताऱ्याला करड्या आवाजांत बजावलें, " म्हाताऱ्या, पिंडीवरचे पाय बाजूला काढ ! देवाच्या पिंडीवर पाय टाकतोस ? "

" बाळ, म्हातारपणामुळें मला पाय उचलवत नाहींत. तूंच जरा बाजूला ठेवशील का ? " म्हातारा सौम्य शब्दांत उत्तरला.

नामदेवानें म्हाताऱ्याचे पाय बाजूला काढून ठेवले. पण काय आश्चर्य ! ज्या ज्या ठिकाणीं त्या म्हाताऱ्याचे पाय ठेवावेत त्या त्या ठिकाणीं महादेवाची पिंडी ! सर्व मंदिरांत पाय नाचवून पाहिले, पण सगळीकडे पिंडीच.

नामदेवाला कळून चुकलें कीं तो म्हातारा म्हणजेच विसोबा खेचर ! आणि त्यांनीं परमेश्वर सर्वत्र आहे हें दाखवून दिलें. नामदेव शरण गेला. विसोबानें त्याला कवटाळलें, आणि गुरूपदेश केला. मग मात्र नामदेव पूर्ण संत झाला.


नामदेवानें भागवत धर्माची ध्वजा उत्तरेंत दूरवर फडकविली. पंढरी नगरीचें महत्त्व वाढविलें. त्यानें कीर्तनपद्धति रूढ केली. ज्ञानेश्वरांचें चरित्र त्यानें ओवीमध्यें लिहिलेलें आहे.

नामदेवाला फार संकटांतून जावें लागलें. लोकांनीं त्याला खूप त्रास दिला. त्याची भरपूर निंदा झाली. नातलगांच्याकडूनहि त्रास झाला. पण त्याची देवावरची उत्कट भक्ति रतिमात्र कमी झाली नाहीं.

नामदेवानें १३५० सालीं पंढरीला समाधि घेतली. तेथें असलेली महाद्वाराची पहिली पायरी ही ' नामदेवाची पायरी ' म्हणून प्रसिद्ध आहे. तीच त्याची समाधि होय !

* *

# ३. अनाथांचा नाथ




अनाथांचा नाथ, रंजल्या गांजल्या पददलित लोकांचा आधार, आणि एकनाथी भागवत अध्याय २९ ओवी ८१० त वर्णन केल्याप्रमाणें—

**" अभेद भक्ति वैराग्यज्ञान । स्वयें आचरोनी आपण ।**
**देखीं लावावे इतर जन । लोकसंग्रह जाण या नांव ॥ "**

आयुष्य व्यतीत करणारा महाराष्ट्राचा थोर, चारित्र्यसंपन्न संत म्हणून एकनाथांचा फार मोठा लौकिक आहे. आज आपण त्यांचा परिचय करून घेऊं या.

नाथांच्या पणजोबांचें नांव भानुदास असें होतें. ते भगवद्भक्त असून चाट्याचा धंदा करीत असत. चाटी सहसा प्रामाणिक असत नाहींत; पण भानुदास सत्योपासक म्हणून त्या वेळीं प्रख्यात होते. भानुदासांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे, " आमुचियें कुळीं पंढरीचा नेम । मुखीं सदा नाम विठ्ठलाचें ॥ " आषाढी, कार्तिकीची वारी त्यांनीं कधीं चुकविली नाहीं.

त्यांची फार मोठी कामगिरी म्हणजे विजयनगरच्या कृष्णराय-महाराजांनीं नेलेल्या विठ्ठलाच्या मोहक मूर्ती परत पंढरीस आणून केलेली प्रतिष्ठापना ही होय.

भानुदासाच्या मुलाचें नांव चक्रपाणी व नातवाचें नांव सूर्यनारायण होय. भानुदासांच्या पश्चात् चक्रपाणी व सूर्यनारायण यांनीं भगवद्भक्तीची परंपरा पुढें चालविली.

शके १४५५ च्या सुमारास पैठण येथें, मूळनक्षत्रावर सूर्यनारायणाच्या पोटी नाथांचा जन्म झाला! नाथ मूळनक्षत्रावर जन्मले म्हणून त्यांच्या माता पित्यांनीं हाय खाल्ली व त्यांतच त्यांचा दुःखद अंत झाला.

नाथांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांच्या आजा–आजींना स्विकारावी लागली. नाथ त्यांच्या घरीं वाढूं लागले. नाथांच्या बालपणच्या बाललीला पाहून आजाआजींना फारच कौतुक वाटे. नाथ दगडांच्या देवाची मनोभावें पूजा करीत आणि फाटक्या कापडाची पताका करून 'पंधलीला ज्यातो' असें म्हणत. हें ऐकून त्या वृद्ध आजाआजींना फारच समाधान वाटे.

चक्रपाणींनीं नाथांच्या अध्ययनाची सोय केली. एक पुराणिक नाथांच्याकडून अध्ययन करवून घेऊं लागले–दररोज पुराण सांगूं लागले. नाथांच्या डोक्यांत अनेक शंकांचें काहूर उठूं लागलें. पुराणिक बुवांनीं शंकांचें निरसन करण्याची शर्थ केली; पण नाथांना समाधान वाटलें नाहीं. ते नेहमीं विचारक्रांत असायचे. पैठणांत त्यांचें मन रमेना. त्यांच्या डोळ्या-समोर ध्रुव-प्रल्हादाचें चित्र होतें.

एके दिवशीं नाथांनीं भल्या पहाटे, कोणालाहि कल्पना न देतां घराबाहेर पाऊल टाकलें. कांहीं वेळानंतर ही गोष्ट चक्रपाणींच्या लक्षांत आली. त्यांनीं खूप शोध केला; पण नाथांचा पत्ता लागला नाहीं. पुराणिकांच्या घरीं चौकशीसाठीं गेले; पण पुराणिकहि बेपत्ता होते! चक्रपाणींचा धीर सुटला. त्यांना वाटलें कीं पुराणिकानेंच नाथांना पळविलें!

इकडे नाथ दौलताबादच्या रस्त्यानें, साक्षात्कारी सद्गुरूला शरण जाण्यासाठीं जनार्दनस्वामींकडे जात होते.

त्या काळीं जनार्दनस्वामी साक्षात्कारी सत्पुरुष म्हणून प्रख्यात असून भगवान दत्तात्रेय त्यांच्याशीं संभाषण करीत असत असें म्हणतात.

जनार्दन स्वामींची कर्तबगारी पाहून बादशहानें त्यांना दौलताबादचा सर्वाधिकारी नेमलें होतें.

नाथ स्वामींच्याकडे आले. स्वामींनीं त्या लहानग्या बालकाची धडपड आणि गुरुभक्तीसाठीं लागलेली तळमळ आणि त्यासाठीं केवळ बारा वर्षें वयाच्या या कोंवळया मुलाची कष्ट सोसण्याची तयारी पाहून नाथांना आपल्या-जवळ ठेवून घेतलें आणि त्यांच्याकडून ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व भागवत इत्यादि ग्रंथांचीं अनेक पारायणें करून घेतलीं.

शके १४८० च्या फाल्गुन वद्य षष्ठीस स्वामींनीं नाथांना गुरूपदेश दिला आणि जवळच असलेल्या सुलभ-पर्वतावर ध्यानधारणेसाठीं जाण्यास आज्ञा केली.

नाथ त्या पर्वतावर गेले. त्यांनीं समाधी लावली. त्यांच्या समोर भगवंतांची मूर्ति प्रकटली. नाथांची स्थिति त्या वेळीं त्यांच्याच शब्दांत अशी झाली होती कीं,

**“एका जनार्दनीं पुजा । देवभक्त नाहीं दुजा ॥**
**अवघाचि सद्गुरु राजा । होवोनि गेला ॥”**

नाथ चिंतनांत मग्न झाले होते. एक कृष्णसर्प त्यांना दंश करण्या-साठीं अंगावर धावून गेला. पण त्याची ती दंश करण्याची दुष्ट बुद्धि नष्ट झाली. आणि नाथांना ऊन लागूं नये म्हणून त्यानें नाथांच्या शिरावर आपली फणी धरली. एका शेतकऱ्यानें तें पाहिलें. त्याला वाटलें कीं, कृष्णसर्प नाथांना दंश करणार ! आणि तो ओरडूं लागला. रडूं लागला. नाथांची समाधि भंग पावली. साप बिळांत निघून गेला. शेतकऱ्याचा जीव भांड्यांत पडला. त्यानें नाथांना भक्तिभावानें अभिवादन केलें आणि तो निघून गेला.

घडलेली सारी हकीगत नाथांनीं जनार्दन स्वामींना सांगितली. जनार्दन स्वामींनीं आपल्या शिष्योत्तमाला आलिंगन देऊन अभिनंदन केलें. स्वामींनीं

(२१) ९४४३४

नाथांच्या जवळ 'आपण तीर्थयात्रेला जाण्याचा मनोदय व्यक्त केला.' गुरु-शिष्य तीर्थयात्रेला निघाले.

कांहीं दिवस प्रवास केल्यानंतर चंद्रावती येथील चंद्रभट नांवाच्या एका विद्वान ब्राह्मणाकडे त्यांनीं मुक्काम केला. जेवणानंतर रात्रीं चंद्रभटांनीं चतुःश्लोकी भागवताचें सुंदर विवरण केलें. नाथांच्या व स्वामींच्या मनावर खोलवर परिणाम झाला. आणि तत्क्षणींच स्वामींनीं नाथांना प्राकृतांत चतुःश्लोकी भागवतावर– टीका ग्रंथ लिहिण्याची आज्ञा केली. नाथांनीं तो ग्रंथ अत्यंत श्रद्धेनें प्राकृतांत लिहिला. एकनाथांच्या ओवीबद्ध काव्यांची ग्रंथ संख्या ६०,००० असून ७५,००० वर त्यांच्या कविता आहेत.

जनार्दन स्वामींनीं नाथांना एके दिवशीं एकट्यानेंच तीर्थयात्रा करण्याची आज्ञा केली. गुरुवियोगामुळें नाथांना फारच वाईट वाटलें. त्यांच्या अंतःकरणाला अतोनात वेदना झाल्या. तरीहि नाथांनीं गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून तीर्थयात्रा पुरी केली.

दोन अडीच वर्षांनंतर नाथ पैठणला आले. पुराणिकबुवाहि त्या वेळीं आपोआप प्रकटले. त्यांनीं नाथांना ओळखलें व घरीं जाण्याचा आग्रह केला. नाथ आणि पुराणिकबुवा घरीं जात असतांनाच रस्त्यांत चक्रपाणींचीं गांठ पडली. नाथांना पाहतांच चक्रपाणींचें अंतःकरण भरून आलें. नाथांनाहि आपला भावनावेग आवरणें कठीण झालें. चक्रपाणींनीं आपल्या नातवाला कडकडून दृढालिंगन दिलें व गृहस्थाश्रम स्विकारण्याची नाथांना विनंति केली. नाथांनीं त्याला नकार दिला. पण चक्रपाणींनीं जनार्दन स्वामींच्या कडून आणलेलें आज्ञापत्र दाखविलें. ज्या ठिकाणीं नाथांना आज्ञापत्र आलें त्याच ठिकाणीं त्यांनीं एक झोंपडी बांधली व ते तेथेंच राहूं लागले. त्यांनीं विजापूर येथील सदाचारी ब्राह्मणाच्या कन्येशीं– गिरिजाबाईशीं विवाह केला. गिरिजाबाई म्हणजे एक रत्न होतें. त्या पतिपरायण असून अत्यंत श्रद्धाळू अशा होत्या.

अशा तऱ्हेनें नाथांचा सुखी संसार सुरू झाला. एके दिवशीं एक गरीब ब्राह्मण नाथांच्यापुढें हात जोडून उभा राहिला व म्हणाला, "महाराज,

मी भुकेकंगाल गरीब ब्राह्मण आहे. आपण मला पदरीं ठेवा. मला फक्त दोन वेळां जेवण दिलें कीं पुरें; आणि कांहीं नको. माझें नांव कृष्ण. मला कोणी श्रीखंड्या असेंहि म्हणतात.” नाथांना त्या गरीब ब्राह्मणाची दया आली. त्यांनीं त्याला आपल्या पदरीं ठेवलें. पुढें तो बारा वर्षें नाथांच्या घरीं राहिला. तो नाथांच्या घरीं कावडीनें पाणी भरीत असे व पूजेसाठीं चंदन घासून देत असे. पुढें तो एके दिवशीं एकाएकीं नाहींसा झाला. नाथांना कळून चुकलें कीं श्रीखंड्या म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून श्रीहरीच होय! आणि ते सद्गदीत झाले.

नाथांच्याकडे भेदभावाला थारा नव्हता.

**आपणा सारिखे करिती । यातिकुळ नाहीं चित्तीं ॥**

अशी त्यांची वागण्याची तऱ्हा होती. एकदां नाथांच्या घरीं श्राद्धाचें जेवण होतें—आंत पंचपक्वान्नांचा थाटमाट चालला होता आणि त्याचा खमंग वास आजूबाजूला दरवळत होता. कांहीं महार मंडळी त्यांच्या घरावरून जात होती. घरांतल्या त्या खमंग वासानें भुकेनें वखवखलेल्या त्या बिचाऱ्या लोकांचे पाय रेंगाळू लागले. त्यांपैकीं एकजण म्हणाला, “आज हितं जेवाण हाय वाटतं. आपणास्नी जेवाय मिळालं असतं तर किती बरं झालं असतं न्हाई?” दुसरा उद्गारला, “छेरे आम्हास्नी कसं जेवायला मिळणार? मुकाट्यानं [illegible]”

[illegible] झाले. त्यांना त्या लोकांचा कळवळा आला. त्यांनीं त्यांना बोलावून घेऊन बाकींच्या महारवाड्यांतल्या मंडळींना बोलावून आणण्यास सांगितलें.

क्षणार्धांत नाथांच्या ओटीवर महारांची पंगत बसली. स्वत: नाथ व गिरिजाबाईंनीं वाढण्याचें काम केलें. महार मंडळी पोटभर जेवून नाथांना दुवा देत निघून गेली.

नाथांच्या या वागण्यामुळें सनातन्यांचा संताप शिगेला पोहोंचला हें निराळें सांगायला नकोच.

नाथांची दुसरी एक गोष्ट प्रसिद्ध आहे. नाथ गंगेवरून स्नान करून घरीं येत होते. एक महाराचें पोर उन्हाच्या चटक्यानें किंकाळत होतें. नाथांनीं त्याला कडेवर घेतलें व महारवाड्यांतल्या त्याच्या आईकडे पोहोंचविलें.

आणि एकदां राणू महार नावांच्या गृहस्थानें नाथाला जेवणाचें आमंत्रण दिलें. नाथ त्याच्या घरीं यथेच्छ भोजन करून आले. काशीची कावड रामेश्वरला नेत असतांना वाटेंत तहानेनें व्याकुळ झालेल्या गाढवाच्या मुखांत गंगा घालण्यास तेहि मागे झाले नाहींत.

अशा तऱ्हेचें नाथांचें वागणें भेदातीत होतें. नाथ म्हणजे शांतीचे सागर. भक्तीचे आगर होते. एकदां एक निष्कांचन ब्राह्मण आपल्या मुलाच्या मुंजीसाठीं लागणाऱ्या द्रव्ययाचनेकरितां पैठणच्या ब्राह्मणांकडे आला. ब्राह्मणांनीं द्रव्य-प्राप्तीसाठीं एक अट घातली. 'नाथांना राग येईल–चीड येईल असें कांहीं कर म्हणजे तुला आम्ही द्रव्य साहाय्य करतों.'

लोभी ब्राह्मणानें ही अट मान्य केली व तो नाथांच्या घरीं येऊन मोठमोठ्यानें अद्वातद्वा बोलूं लागला. नाथ कसचे चिडताहेत! त्यांनीं त्या ब्राह्मणाचें स्वागत केलें. व त्याला इच्छा भोजन देण्याचें ठरविलें. जेवण तयार झालें. नाथ व ते लोभी ब्राह्मण जेवणास बसले. गिरीजाबाई वाढत होत्या. लोभी ब्राह्मणाला काय करावें कळेना. इतक्यांत त्याला एक नामी युक्ति सुचली. तो ताटावरून चटकन् उठला व वाढण्यासाठीं ओणवा झालेल्या गिरीजाबाईंच्या पाठीवर उडी मारून बसला! नाथ खदखदून हंसले व म्हणाले, अग, भटजींना पाडशील बिडशील बरं का?" गिरीजाबाई म्हणाल्या, 'नाहीं नाहीं' त्यांना बिलकूल पाडणार नाहीं, बरें का?' पांडुरंगाला पाठीवर घेऊन मला संवय झाली आहे!"

ब्राह्मण ओशाळला. त्याला फार वाईट वाटलें. त्यानें सारी हकीकत सांगितली. नाथांनीं त्याला द्रव्य देऊन पाठविलें. दुसरीहि अशीच एक मजेदार कथा प्रसिद्ध आहे. नाथ स्नान करून घरीं येत होते. एक उन्मत्त गुंड वाटेवर बसला होता. नाथ येतांच त्यानें नाथांच्या अंगांवर थुंकण्याचें

धाडस केलें. नाथ कांहीं बोलले नाहींत, ते परत गंगेवर गेले. स्नान करून परत येऊं लागले. पुन्हां तो गुंड नाथांच्या अंगांवर थुंकला. नाथ म्हणजे शांति ब्रह्म. ते अजिबात चिडले नाहींत. परत गंगेवर गेले. स्नान करून ते परत येऊं लागले पुन्हां तोच प्रकार ! असें एकशें आठ वेळां घडलें. नाथ कांहीं रागावले नाहींत वा चिडले नाहींत. त्या गुंडाला पश्चात्ताप वाटला. त्यानें नाथांची क्षमा मागितली. पण नाथ म्हणाले, "माझी क्षमा मागण्याचें कारण नाहीं. मीच तुमचे आभार मानावयास पाहिजेत. कारण तुमच्यामुळें मला आज १०८ वेळां गंगेचें स्नान घडलें."

नाथ कीर्तन करीत आणि भगवान् त्यांच्या पाठीमागें टाळ वाजवून ध्रुपद धरीत असत असें म्हणतात. त्यांनीं ग्रंथरचना प्राकृतांत केली. ब्राह्मणांनीं त्या वेळीं नाथांचा अतिशय छळ केला. पण नाथ डगमगले नाहींत. त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे--

**संस्कृतवाणी देवें केली । प्राकृत तरी चोरापासुनी जाली ॥**

आणखी एके ठिकाणीं त्यांचा हाच बाणेदारपणा दृष्टीस पडतो–

**देवासी नाहीं वाचाभिमान । संस्कृत प्राकृत त्या समान ॥**
**ज्या वाणीं जालें ब्रह्मकथन । त्या भाषा श्रीकृष्ण संतोषे ॥**

मराठी भाषेबद्दलचा त्यांचा अभिमान तर मराठी माणसाला सदैव स्फूर्ति देत राहील ! त्यांनीं अभिमानानें एके ठिकाणीं नमूद केलें आहे कीं–

**मराठी भाषा चोखडी । परब्रह्में फळली गांठी ॥**

नाथांचें वाङ्मय विपुल आहे. त्यांनीं शुकाष्टक, प्रल्हाद विजय, आनंदलहरी, हस्तामलक, स्वात्मसुख आदि स्फुट प्रकरणें लिहिलीं असून चतुःश्लोकी भागवतावर लिहिलेली उद्‌बोधक टीका व त्यांनीं भागवतांतील अकराव्या स्कंधावर लिहिलेलें भाष्य एकनाथी भागवत म्हणून प्रसिद्ध असून काशीच्या पंडितांनीं त्या ग्रंथाची पालखींतून मिरवणूक काढून जणूं प्राकृतचें महत्त्व मान्य केलें.

नाथांची भारूडें प्रसिद्ध असून त्यांतून त्यांनीं बहुजन समाजाला जागृत करण्याचा परिणामकारक प्रयत्न केला आहे. त्यांनीं ज्ञानोबारायांच्या दृष्टांतानुसार पैठणहून आळंदीला येऊन ज्ञानदेवाचें दर्शन घेतलें व ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध करून महाराष्ट्राला कायमचें उपकृत केलें.

नाथांच्या जीवनास आतां उतार लागला. त्यांना एकंदर तीन अपत्यें, दोन मुली व एक मुलगा. थोरली मुलगी गोदावरी, तिच्या पोटीं कवि मुक्तेश्वरांच्या जन्म झाला. नाथ शेवटीं भावार्थ रामायण लिहीत होते. युद्ध कांडाच्या चव्वेचाळीसाव्या अध्यायापर्यंत ग्रंथ लिहून झाल्यावर पुढील ग्रंथ-रचना गावबा नांवाच्या शिष्यावर सोंपवून नाथ लोकांना 'आपण आतां जाणार' असें सांगूं लागले.

शके १५२१ फाल्गुन वद्य षष्टीचा तो दिवस. गोदावरीच्या वाळवंटांत नाथांनीं अत्यंत भक्तिभावानें शेवटचें कीर्तन केलें. शेंकडो भक्तगण नाथांच्या मुखांतून प्रसवले गेलेलें शब्दामृत प्राशन करीत होते. कीर्तन संपलें, नाथांनीं सर्वांचा निरोप घेतला आणि ते गोदामाईच्या पवित्र कुशींत शिरले. तेजांत तेज मिळालें.

**एका मिळवी जनार्दन । तेजीं मिळाला आपण ॥**

* *

# ४. संत शिरोमणी




## " गोविंद गोविंद । मना लागो हाचि छंद "

देवळांत भजनाला चांगलाच रंग चढला होता. टाळांचा आवाज आणि पायांचा ठेका यांनीं एक नवीनच वातावरण तयार झालें होतें. सगळेजण देहभाव विसरून हरि-भजनांत दंग झाले होते.

संत शिरोमणी तुकोबारायांचा आज बीजाचा समारंभ, 'ज्ञानबा-तुकाराम' नामघोषानें वातावरण कसें भरून गेलें होतें ! पांडू जाधवाचा ज्ञानू आज तुकाराम महाराजांची माहिती सांगणार होता. तो सातवी पास झाला, नंतर आठवीला नांव न घालतां माळ घालून माळकरी झाला. आषाढीला पंढरीनाथाला साक्ष ठेवून ज्ञानूनें तुळशीमाळ धारण केली. तो लहानपणापासूनच भजनांत दंग होऊन जायचा. आजोबांची वारी बापानें चालविली. बापाची परंपरा चालविणारच असें लोक बोलत होते., तें शेवटीं खरें झालें.

ज्ञानू एकदोनदां पंढरीलाहि गेला होता. पंढरी व पांडुरंगाचें ज्ञानूला भारी वेड! ज्ञानू दिसायला गोड होता, वागायला गोड होता आणि ज्ञानूचें बोलणेंहि गोड होतें. तो कोणालाहि दुखवीत नसे, तो सेवाधारी असून परोपकारी होता. गांवकरी आपापसांत बोलतांना ज्ञानूचें मनापासून कौतुक करीत. लहानमोठे सारेजण ज्ञानूवर फारच माया करीत.

नामाचा गजर झाला. ज्ञानू उभा राहिला, सगळें शांत झालें. धरणीला हात लावून–हात जोडून "बोला पुंडलिक वरदेव हरिविठ्ठल। श्री ज्ञानदेव तुकाराम, वासुदेव हरि॥" असा नामघोष झाला.

ज्ञानू बोलूं लागला. "बापहो, मी आज आपणांना तुकाराम महाराजांची माहिती सांगणार आहे. तुकोबारायांचें नांव काढतांच आपलें अंग शहारतें व मान आपोआप खालीं लवते. बाबांची करणी अखिल मानवजातीला उजाळा देणारी व वंदनीय अशीच आहे.

तुकारामबुवा आपणांसारखेच संसारी पुरुष होते. पण ते बायकांपोरांत रमले नाहींत. नामघोषांतच रमले. बायकांपोरामुळें ते संसारी वाटत असले तरी ते आंतून बेचैन होते.

दुकानांतला माल देतांना आपण काय करीत आहोंत याचें भान बुवांना नसायचें! मनाला सारखी ओढणी लागली होती. पांडुरंगाशीं ते हळूंहळूं एकरूप होऊं लागले.

महाराजांची रसवंती गंगौघासारखी धांवत होती. लाखो अभंग पांडुरंगावर अभिषेक करूं लागले.

यातिहीनांनीं अभंग करूं नयेत, असें दांभिक व सनातनी लोकांना वाटत होतें, ते चिडले, संतापानें बेहोष झाले, महाराजांचे अभंग नदींत बुडविले गेले; तेरा दिवस महाराज नदीकांठीं बसले, ते कोणावर रागावले नाहींत, रुसले नाहींत अगर चिडलेहि नाहींत!

बुवांनीं पांडुरंगाचा धांवा केला! पांडुरंग धांवला!! बुडविलेले अभंग तरंगू लागले. विरोधकांना लाज वाटली. तेहि भजनीं लागले. विरोधकांनीं बवांची क्षमा मागितली.

एके दिवशीं महाराजांचें देवळांत भजन चाललें होतें. भजनांत ते चांगलेच रंगले होते. मुखानें सारखा हरिनामाचा घोष चालला होता, बरेंच लोक होते तेथें. तेहि हरिनाम–रसपान करून गुंग झाले होते.

मंबाजी नांवाचा एक ढोंगी बुवा होता. तो दिवसभर गांजा ओढून डोळे लाल करून बसलेला असे. महाराजांभोंवती लोक जमतात–भजनांत सामील होतात. हें पाहून मंबाजीचा जणुं पोटशूळ उठला. तो खूप चिडला बाभळीची फांदेरी आणून मंबाजीनें तुकाराम महाराजांना गुरासारखें झोडपलें. अंगांत कांटे घुसत होते. मंबाजी थकला. निघून गेला.

आवलीला ही सारी हकीगत कळली. ती धांवली. तिनें महाराजांना घरीं नेऊन अंगांतले कांटे काढले व लोणी आणि हळदीचा लेप दिला. दिवस मावळला, अंधार पडला, सगळे झोंपले. महाराजांना झोंप कुठली? ते उठले, मंबाजीकडे आले, मंबाजीला चाहूल लागली. महाराजांनीं ओळख दिली. "मी तुका, माझें अंग दगडासारखें कठीण आहे. आपले हात नाजूक आहेत. आपले हात दुखत असतील, चेपायला आलोंय मी!"

मंबाजीला वाईट वाटलें. तो खजील झाला. आपलें डोकें पायावर ठेवून मंबाजीनें बुवांची क्षमा मागितली.

आणि एकदां काय झालें, तुकाराम महाराज भजनांत रंगले होते. शिवाजीराजे न कळत भजनाला येऊन बसले होते. मोंगली फौजेला ही बातमी समजतांच सभोंवार वेढा पडला. सगळे हदरले, मनाची चलबिचल सुरू झाली, महाराजांनीं सांगितलें, "कोणीहि घाबरूं नका–विचलित होऊं नका." महाराजांनीं पांडुरंगाचा धांवा केला. पांडुरंगानें पंढरी सोडली, शिवाजीचें रूप धारण करून तो दरवाजांतून पळून जात आहे असें भासविलें. मोंगलांची फौज मागें लागली, शिवाजी सांपडेना, फौज थांबेना. आडरानांत शिवाजीराजे एकाएकीं दिसेनासे झाले. मोंगली फौजेला काय करावें कळेना. ती हात चोळत मागें फिरली.

शिवप्रभूला मोठें नवल वाटलें ! शिवरायांनीं सरदारांकरवीं तुकाराम बुवांना नजराणा पाठवून दिला. बुवा भजनांत दंग झाले होते.

**"गोविंद गोविंद । मना लागो हाचि छंद"**

मुलगा धांवत आला. बुवांना आवलीचा निरोप पोहोंचला. बुवा घरीं आले. सरदार हात जोडून सामोरे गेले. ताटांत मोहरा झळकत असून उंची कपडे शोभून दिसत होते. जवळच एक नामी पालखी होती. दागदागिने आणि हिरे-माणकें तळपत होतीं !

आवलीचा आनंद गगनांत मावेनासा झाला होता. बुवा गंभीर झाले. सरदारांना जवळ बोलावून सांगितलें, "याचा मला कांहीं उपयोग नाहीं! आहे हें बरें आहे! हें सारें परत घेऊन जा." महाराजांना सांगा, "पांडुरंगाची नेहमीं आठवण करा. तुळशीची पूजा करा. एकादशी करा. पंढरीराव तुमचें भलें करील" सरदार चमकले. ते तोंडाकडे पाहातच राहिले, कांहीं वेळानें ते सारे निघून गेले. महाराजांचें काम संपलें होतें. ठरलेला दिवस जवळ आला. ते पांडुरंगाशीं एकरूप झाले होते. बायका-पोरांना तुकाराम महाराजांनीं विचारलें; "येता का वैकुंठाला?" मग कोणी होकार दिला नाहीं. बुवा मनापासून हंसले. ओठ हालले. "ठीक आहे, तर मग मीच जातो एकटा." बुवा चालले. मागें गांव लोटला. पिंपरीखालीं महाराजांचें शेवटचें भजन झालें.

बुवांनी हात जोडून भाविकांचा निरोप घेतला.

**"आतां कैंचें येणें जाणें । सहज संपलें बोलणें"**

महाराज भजन करीत करीतच पंढरीनाथाशीं समरस झाले !

ज्ञानूचे डोळें पाणावले होते. वातावरण गंभीर झालें होतें. नामाचा गजर सुरू झाला—

**गोविंद गोविंद । मना लागो हाचि छंद ॥**

* *

# ५. आमचे बापूजी




आज गांधी जयंति! मुलांनीं गुरुजींकडून गांधीजींची माहिति विचारून घेतली. तीन तासानंतर गंभीर अशा वातावरणांत सभा संपली.

नितीन घरीं आला; तो कोणाबरोबर बोलला नाहीं. कोणाबरोबर हंसला नाहीं; अगर पोटभर जेवलाहि नाहीं. आईनें विचारलें, "नितीन, बोलत कां नाहींस रे? का तुला बरें वाटत नाहीं?"

"नाहीं ग आई, तसें कांहीं नाहीं. आज मला करमेनासें झालें आहे! कसेंसेंच होतंय मला. गादी टाकली आहे का? जरा आडवा होतों मी."

आई कांहीं बोलली नाहीं. नितीन झोंपला. पण झोंप कुठली यायला? अंथरुणावर तो उठून बसे. डोळे चुरचुराय लागले कीं झोंपे.

गुरुजींनीं सांगितलेली म. गांधीजींची अमर कहाणी आठवून तो रडत होता. अंथरुणांत डोकें खुपसून तो रडत होता! नराधम खुनी माणसाचा नितीनला फारच संताप आला होता. मधूनमधून दांतांचा किरकिर आवाज होत होता.

बाराचा ठोका पडला. नितीनला झोंप लागली; पण—

गुरुजींचें भाषण चाललेलें नितीनला दिसलें. तो मनापासून ऐकत होता.

बाळांनो, बापूजींची आज जयंती ना? बापूजींची मी माहिती सांगणार आहें. ऐका.

बापूजींचें नांव मोहनदास करमचंद गांधी. हा पोरबंदरचा मोहन, जगाला मोहून टाकणार असें बालपणीं कोणालाहि वाटलें नाहीं. ते इतरांसारखेच बालपणीं वागले. ते चुकले नाहींत असें नाहीं. चुकले. चोरी केली. खोटें बोलले. पण लगेच ते भानावर आले.

बापूजींनीं आपण केलेली चोरी आपणच उघडकीला आणली. वडिलांना कळवून शपथ वाहिली, "मी येथून पुढें कधींहि चोरी करणार नाहीं या खोटेंहि बोलणार नाहीं."

शिक्षणासाठीं ते विलायतला निघाले. विलायतेंत थंडी फार. दारुमांसाशिवाय तेथें चालायचें नाहीं, अशी कुणकुण पुतळामातेला लागली. तिला भीति वाटत होती, "आपला मोहन विलायतेंत दारू पिणार, मांस खाणार!"

विलायतेंत जातांना बापूजींनीं आईला वचन दिलें, "आई, मी विलायतेंतच काय पण कोठेंहि गेलों तरी दारू पिणार नाहीं आणि मांसहि खाणार नाहीं."

आईला आनंद वाटला. बापूजींनीं आईचा निरोप घेतला. ते विलायतला गेले. तेथें ते वकिलीची परीक्षा पास झाले, नंतर भारतांत आले. मुंबई व राजकोट येथें वकिली केली. पण बापूजींना समाधान वाटलें नाहीं. धंदेवाईक वकिली सोडून ते देशाचे वकील झाले. मानवतेची वकिली बापूजी करूं लागले.

सुरवातीला एकदां एक खटला चालविणेसाठीं बापूजींना परदेशांत जावें लागलें. तेथील भारतीय लोकांचा छळ व चालत असलेली मानहानीची वागवणूक पाहून ते फारच गरम झाले. बापूजींनीं सरकारला बजावलें,

" यापुढें भारतीयांचा छळ थांबला पाहिजे. ते येथून पुढें मान तुकवून लाचारीचें जीवन जगणार नाहींत. अभिमानानें मान ताठ करून इतरांसारखेच जगतील."

सरकार खवळलें. बापूजींवर खटला भरला. शिक्षाहि झाली. पण बापूजींना वाईट वाटलें नाहीं, अगर ते निराशहि झाले नाहींत. इतर भारतीय लोकांना फाराच वाईट वाटलें. ते सरकारवर संतापले.

शिक्षा संपली. बापूजी सुटले. परदेशांतील भारतीयांना धिटाईचें व अभिमानाचें शिक्षण देऊन ते मायदेशीं परत आले.

देशांत बापूजींचा दौरा सुरू झाला. भारतांत बापूजींना काय दिसलें, सगळीकडे अज्ञानाचा अंधार पसरला होता. जातीजातींतील भांडणें विकोपाला गेलीं होतीं. सगळीकडे लाचारी बोकाळली होती. सारा देश गुलामगिरींत लोळण घेत होता.

बापूजींचा दौरा संपला. ते गंभीर झाले. मनाशीं बेत केला. असहकाराची चळवळ बापूजींनीं सुरू केली. सुरवातीला लोकांना ती पोरकटपणाची वाटली. सरकारला तेंच हवें होतें. असहकाराची चळवळ दडपून टाकली गेली.

चळवळींत भाग घेणारे तुरुगांत गेले. बापूजींनीं तुरुंगाचें रूपांतर लोकशिक्षण शाळेंत केलें. तुरुंगांतून बाहेर पडणारे लोक नवविचार, नवीन आशावाद घेऊन बाहेर पडले.

१९३० ला मिठाचा लढा भारत लढला. परकीय लोक भारतांत आले. ही नवीनच सुरू झालेली लढाई पाहून ते गेले. या लढाईमुळें भारतीयांची भीति पार नाहींशी झाली. देशासाठीं तुरुंगांत जाणें हें मंदिरांत जाणें होय असें भारतीय तरुणांना वाटूं लागलें.

१९४२ ला तर बापूजींनीं अखिल भारताला संदेश दिला, "गुलामगिरीचीं बंधनें तोडा. सारीं सरकारी बंधनें झुगारा. हा सारा माझा देश, या भावनेनें या आंदोलनाकडे पाहा."

हजारों लोकांनीं या आंदोलनांत उडी घेतली. अनेक ठिकाणीं गोळीबार झाले. कैक माणसें गोळीबाराला बळी पडलीं. सरकारी पैसा लुटला गेला. वाहातुकींत अडथळे आणले गेले. परदेशी कापडांची होळी झाली.

सरकार घाबरलें. मिळतील तेवढे लोक पकडले गेले. तुरुंग माणसांनीं फुलून गेले. तुरुंगांत भारतीय-वीरांचा अतोनात छळ झाला.

अखेर सरकारला तडजोड करावी लागली. १९४६ ला सरकारनें नमतें घेतलें. सारे देशसेवक सुटले. १९४७ ला परकीयांना भारताला सोडून जाणें भाग पडलें. ते गेले. ४० कोटी मुखांनीं भारताचा जयजयकार केला. पण एका देशाचे दोन देश झाले. जातीयवादाचा विजय झाला. जातांना परकीय लोकांनीं आपलें साधलें—भावाभावांतलें भांडण वाढवून दोन वेगळाले देश तयार केले. बापूजींना फारच वाईट वाटलें. ते फिरूं लागले. दंगाधोपा होऊं नये यासाठीं बापूजींचा जीव तडफडत होता; पण शेवटीं काळपुरुषानें बापूजींना घेरलें. जातीयवादाला—या राक्षसी भेदाला—बापूजींना बळी पडावें लागलें. एका माथेफिरू नरपशूनें बापूजींचें शरीर मातींत मिसळलें.

अंथरुणावर पडलेला नितीन मुसमुसूं लागला. गांधीजींचा खून करणारा माणूस नितीनसमोर उभा होता! नितीननें आपली मूठ आवळली. तो धांवला. पण....

नितीनचे डोळे उघडले. तो गादीवरून, जमीनीवर गडगडला होता. इकडे तिकडे पाहात तो उठून बसला. आईनें हांक मारली. नितीन पळत गेला. आईला मिठी मारून घडलेली सारी हकीगत सांगितली. आईनें उसासा टाकला आणि तिनें नितीनला, बापूजींना हार घालून अभिवादन कर, असें सांगितलें. नितीनला आनंद झाला.

* *

# ६. आधुनिक संत



तो ११ जून १९५० चा दिवस होता. एक गरिबांचा पाठीराखा थोर देशसेवक महान् संत मरणाचें मंगल गीत गात, मरणाचें कडकडून चुंबन घेत आणि हें जग सोडून जावयाचेंच--चिरकाल शांति मिळवावयाचीच असें मनाशीं ठरवून तयारीला लागला.

गुरुजींनीं दाढी केली. आंघोळ करून पांढरी सफेत खादी परिधान केली. ते लिहायला बसले. दररोज झरझर चालणारा हात आज अधून-मधून अडखळत होता-विसावा घेत होता. गुरुजींनीं अनेकांना निरोप लिहून ठेवले. ते गंभीर झाले. गालावरून कांहीं ओघळलें असें भासलें. ओंठावर मंद हसूं खेळत होतें-गुरुजींनीं हात जोडले. डोळे मिटले गेले. मूकपणानें व संथगतीनें झोपेचें औषध हातांत घेऊन तें कवटाळलें. डोळे उघडले. क्षणांतच ते आपोआप मिटले. अनेक आठवणींनीं गुरुजी गहिंवरले. असें कितीतरी वेळ चाललें होतें.

शेवटीं डोळे उघडे झाले. झोपेचें औषध पाहून ते मनापासून हंसले. औषध किती छान दिसत होतें! गुरुजींनीं तें तोंडांत टाकून फुलामुलांना, पशूपक्ष्यांना, झाडामाडांना, देशांतील दलितांना, शेतकरी-कामगारांना शेवटचा रामराम केला. हळूहळू गुरुजींचे डोळे मिटूं लागले. अंग जडजड वाटूं लागलें. पक्षी उडाला. पिंजरा रिकामा पडला. धडपडणारा देह आणि तळमळणारें मन एकदाचें थंड झालें.

गुरुजी धडपडले. झटले. जीवनभर गुरुजी चंदनासारखे झिजले. विसावा नाहीं. कंटाळा नाहीं. एकच तळमळ. एकच आशा. नवीन जगाची नवी उभारणी. नवभारताचा नवा पाया खोदायचा. नवसमाजरचनेची पायाभरणी करून समतेचें शिखर गांठायचें. हीच गुरुजींची एकमेव आशा होती.

गुरुजी कधीं शांत असायचे नाहींत. कधीं फिरतील. कधीं बोलतील. निदान कांहींतरी लिहीत तरी बसतील. गुरुजी रानावनांतून फिरले, गांवा-गांवांतून हिंडले, चाळीचाळींतून भटकले.

रानांत गुरुजींना घामाचे ओहोळ वाहात असलेले दिसले. सांवळा शेतकरी वीतभर लंगोटी घालून घाम गाळत असलेला, खपत असलेला दिसला. बायका पोरें चिखलांत लोळत असलेलीं दिसलीं.

गांवांत भांडणें दिसलीं. जातीयवादाचा वणवा भडकलेला पाहावयास मिळाला. महारामांगांचीं पोरें हातांत वाडगा घेऊन घरांसमोर घांसासाठीं तळमळत असलेलीं दिसलीं. देवळांत जनावरें बसलीं तरी चालतात. जनावराला शिवलें तर विटाळ होत नाहीं. पण महार आपणांला शिवतां कामा नये. देवळांत गेलेला महारामांगाचा पोर मरेतों मार खाऊन रडत ओरडत आलेला पाहावयास मिळाला.

महार मांगाघरीं जेवत नाहीं. चांभार महाराहातीं पाणी पीत नाहीं.. महार, मांग, चांभार यांना मराठा दूरवर ठेवूनच बोलूं लागतो. मराठी माणसाला लिंगायत कमी लेखतो. लिंगायताला जैन कमी जातीचा असें संबोधून हिणवितो.

हा जातीयवाद ! जातीजातींमधला भयानक असा पाठशिवणीचा खेळहि गुरुजींना पाहावयास मिळाला. हें पाहून गुरूजींना फारच वेदना होत असत. चाळीचाळींतून गुरुजींना काय दिसलें ? घामानें डबडललेला कामगार भाकरीसाठीं तडफडत असलेला दिसला. अंगावर कपडा नाहीं. औषधाला पैका नाहीं. या विवंचनेंतला कामगार गुरुजींना दिसला. अनेक चाळींतून अंगानें रोडका व मनानें दुबळा असा कामगार कपाळावर हात मारून हताश झालेला गुरुजींनीं पाहिला.

आपण काय पाहात आहोंत याचें भान गुरुजींना राहिलें नाहीं. ते चिडले. संतापले. मनाची लाहीलाही झाली. पण कठोर काळापुढें गुरुजी थबकले— थांबावें लागलें.

गुरुजी बोलत होते. खूप खूप बोलत होते. नेहमीं शांत असणारें गुरुजी विषमतेवर सभेंत तुटून पडत. समाज-रचना किती बिघडली आहे, हें ते दाखवून देत. ते बोलत असतांना सभेंतून हुंदके ऐकूं येत. किसान-कामगाराचे डोळे रडावयाचे. क्षणभर का होईना पण चिंतातुर चेहरे कांहीं वेळां फुललेले पाहावयास मिळत.

गुरुजींचा या लोकांना मोठा आधार वाटत होता. आणि गुरुजींचाहि गरीबांचा--दलितांचा-कळवळा पाहून ऊर भरून यायचा. शेतकरी काम-गारांचे चेहरे पाहून गुरुजींची दशा मोठी केविलवाणी होत असे. सावकार दरसाल नवीन नवीन जमीन खरीदतो, शहरोशहरीं नवे नवे बंगले उभारतो आणि गिरणी मालक चैनींत नि विलासांत दिलखुलासपणें लोळण घेत असतो.

कामधंदा न करतां सारें वैभव सावकारासाठीं—भांडवलदारांसाठीं आणि या गिरणी-मालकांसाठीं. पण....पण शेतकरी कंगालपणें जीवन जगत असतो. कामगार लाचारपणें जिणें गिरणींत जगत असतो. हें सारें पाहून गुरुजींचा राग अनावर होई. ते चिडायचे. कधीं संपतील हे हाल ? कधीं सुखी होतील हे लोक ? याची तळमळ गुरुजींना सारखी लागून राहिली होती !!

गुरुजींनीं मुलांमाणसांसाठीं खूप खूप लिहून ठेवलें आहे. तो तरुणांचा एक मोठा ठेवा आहे.

गुरुजींचा मायेचा हात आतां जरी पाठीवरून फिरूं शकत नसला तरी गुरुजींचें अमर लिखाण चिरकाल मनाला पोसायची कामगिरी हिरीरीनें करील यांत संदेह नाहीं.

गुरुजींची 'शामची आई' मुलांना ममतेनें कुरवाळून मनाचा हळुवारपणा व मंगलपणा वाढवील !

गुरुजींचीं , धडपडणारीं मुलें ' मुलांना धडपडावयास लावतील.

गुरुजींचा लाडका 'शशी' जातिभेदाला थारा देतां कामा नये असें चिरकाल ओरडून सांगत राहील.

गुरुजींची सेवापरायण 'मोलकरीण' सुशिक्षित अवखळ पोराला वाट दाखवीत राहील.

गुरुजींचे 'आपण सारे भाऊ' भावांभावांमधले दुरावणारे संबंध सुधारतील; घरगुती भांडणें नाहींशीं करतील. मायाममतेनें सुखासमाधानानें जीवन जगायला शिकवतील.

गुरुजींना फुलामुलांचें भारी वेड होतें. "लहानलहान मुलें हीं देवाघरचीं फुलें" आहेत अशी गुरुजींची धारणा होती. ते मनानें फारच हळवे होते. ते बागेंत जात असत. फुलांकडे कितीतरी वेळ ते पाहात उभे असायचे; पण फुलांना हात लावावयास ते कधींहि धजत नसत. फुलें कोमेजतील ही भीति गुरुजींना वाटत असायची. झाडामाडांना पाहून गुरुजी खुलायचे. आपणांकडून साधी मुंगीदेखील दुखावली जाऊं नये याची ते कटाक्षानें काळजी घेत. पशू-पक्षी हे गुरुजींचे जिवलग सवंगडी होते. गुरुजींना दगडांमधून देव-वेद दिसत. ते देश, देव आणि आई यासाठीं वेडे झाले होते. तडफडत होते.

ते देशासाठीं तुरुंगांत गेले. भयंकर असा छळ सहन केला. परकीय मगरमिठींतून देशाची सोडवणूक करीत असतांना गुरुजींनीं कशालाहि दाद दिली नाहीं.

गुरुजी कधीं कधीं हतबल होत. समाजांत पसरलेलें अज्ञान, रूढी व आपपरभाव यांचा चिखल पाहून ते फारच गळून जात. अशा वेळीं गुरुजींचा खरा आधार देव होता. गुरुजींनीं मुकुंदाला अनेकदां आळविलें आहे-- पांडुरंगानें पांडुरंगाचा अनेकदां धांवा केला आहे. ज्ञानराय माउलीबरोबर गुरुजींनीं खूप वेळ घालविला आहे. गीताई ही तर गुरुजींची खरी आई शोभत होती.

गुरुजींचा आईवर तर फारच जीव होता. ते माउलीसाठीं फारच आंसावले होते. गुरुजींचें मन मातेकडे सारखें धांव घेई. आईचा आसरा हा गुरुजींचा थंडींतला निवारा होता. आई हें गुरुजींचें परम दैवत होतें.


गुरुजींचें दुसरें असें कीं—मरणाचें केवळ कौतुक करणारे—गोडवे गाणारे खूप लोक होऊन गेले; पण मरणाला आनंदानें मिठी मारणारा माणूस कोठें पाहावयास मिळत नाहीं. ज्ञानराय माउलीबरोबर गुरुजीहि अपवाद ठरले. जीवनभर गुरुजींनीं मरणाचें मनापासून कौतुक केलें. मरणाची मंगल कहाणी इतरांना सांगितली. आणि शेवटीं, आपण जसें सांगितलें तसेंच आचरण केलें. "बोले तैसा चाले" हीच गुरुजींची खरी शिकवण !

गुरुजींचें जीवन या संकटकाळीं भारतीय बांधवांना आशादायी वाटेल !

गुरुजींनीं जीवाचें तेल घालून लिखाणरूपी कुडीचा दिवा चिरकाल तेवत ठेवला आहे. हा दिवा पुरातन रूढी, भीषण विषमता आणि अज्ञानाचा गडद अंधार यांतून भारतीयांना समतेची वाट दाखवित राहील, यांत संदेह नाहीं !!!

* *

# ७. राष्ट्र संत विनोबाजी




भारताला संतांची वाण अशी कधीं पडलीच नाहीं. ज्या ज्या वेळीं मानवजात गोंधळांत पडते–निराशेच्या निशेंत चांचपडत असते, त्या त्या वेळीं एखादा श्रेष्ठ पुरुष जन्माला येतो आणि तो गोंधळ व ती निशा नाहींशी होते. माणसाचा आशावाद बळावतो. एक प्रकारचें चैतन्य निर्माण होतें.

विसावें शतक अणुयुगाचें म्हणून ओळखलें जातें. अण्वस्त्रांच्या भयानक शोधामुळें जगांत तंगीचें वातावरण अधिकच निर्माण होत आहे. माणसाची सारी बुद्धि, सारी संपत्ति आणि सारें बळ शस्त्रनिर्मितींत व्यतीत होत आहे. प्रत्येक राष्ट्राचें दार महायुद्ध ठोठावीत आहे. जग हें विकासाकडे जात आहे कीं विनाशाकडे? हेंच कळेनासें झालें आहे.

या संभ्रमकाळीं विनोबाजींचा जन्म व्हावा आणि तोहि अशा विशिष्ट काळींच व्हावा यांत नियतीचा निश्चित हेतु असावा यांत शंकाच नाहीं!

विनोबांचें बाह्य दर्शन साऱ्या भारताला झालेलें असलें तरी त्यांच्या अंतरीचें दर्शन फारच कमी लोकांना झालें आहे हें आपलें दुर्दैव आहे. खरे

विनोबाजी कसे आहेत हें जर समजून घ्यावयाचें असेल तर त्यांच्या आयुष्यांतल्या ठळक घडामोडी समजून घेणें जरूर आहे.

विनोबाजींच्या सार्वजनिक कार्याच्या आयुष्याची सुरवात १९१६ सालीं. इंग्रजी शिक्षणाला अत्यंत महत्त्व असतांना देखील त्यांनीं कॉलेजला रामराम ठोकला आणि ते म. गांधीजींच्या साबरमती आश्रमांत दाखल झाले.

त्यांचा पिंड चिंतनशील असून वृत्ति अध्ययनशील आहे. ते लौकरच आश्रमांतून, बापूजींची एक वर्षापुरतीची परवानगी घेऊन, 'संस्कृतांतील दर्शन-वाङ्मयाचा अभ्यास करण्यासाठीं बाहेर पडले.

वाई येथील प्राज्ञपाठशाळेंत विनोबाजी दर्शन वाङ्मयाचा अभ्यास करूं लागले. तेथें त्यांनीं कांहीं होतकरू तरुणांच्या आग्रहास्तव गीतेचे वर्ग उघडले. विद्यार्थी मंडळाची स्थापना करून एक वाचनालयहि चालविलें. त्यासाठीं लागणारा पैसा त्यांनीं दुसऱ्यांचें दळप दळून उभा केला. कर्ममूर्ति विनोबाजींच्या अंगीं श्रमप्रतिष्ठेचा अमोल गुण लहानपणापासूनच वसत असलेला दिसतो.

वर्ष संपलें. बापूजींना दिलेल्या आश्वासनाप्रमाणें योग्य वेळीं आश्रमांत ते हजर झाले. बापूजींनासुद्धां आश्चर्य वाटलें.

आश्रमांत ते स्वयंपाकापासून संडास सफाईपर्यंतचीं सर्व कामें निष्ठेनें करीत. कोणतेंहि काम ते अत्यंत परिश्रमपूर्वक करीत. आणि त्या कामामध्यें प्राविण्य संपादन करीत.

ज्या रोग्याजवळ माणसें उभीसुद्धां राहात नाहींत त्या कुष्ठरोग्याची ते मनापासून सेवा करीत. कुष्ठरोगाची त्यांनीं चिकित्सा केली. त्यांवर त्यांनीं अत्यंत माहितीपूर्ण असें पुस्तक लिहिलें आहे.

विनोबाजी सूतकताईमध्यें फारच निष्णात असून मूलोद्योगप्रधान शिक्षण पद्धतीचे प्रभावी पुरस्कर्ते आहेत. ते उत्कृष्ट टीकाकार असून वाद-विवाद कुशल आहेत. त्यांची सत्याग्रही वृत्ति सर्वांना परिचित आहे. वैयक्तिक सत्याग्रहाच्या वेळीं पहिला सत्याग्रही म्हणून म० गांधीजींनीं विनोबांची निवड केली होती. त्यांचें कोणतेंहि काम सत्यावर अधिष्ठित असतें.

विनोबांनीं निरनिराळ्या धर्मांचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांना निरनिराळ्या भाषा येतात. ते ज्या प्रांतांत जातात त्या प्रांतांतील लोकांशीं त्यांच्या भाषेंत बोलतात. त्यामुळें ते तेथल्या लोकांना त्यांच्याच प्रांतांतले वाटतात.

विनोबाजींचें बोलणें अंत:करणाला भिडणारें असतें. त्यांच्या मधु-वाणीची मोहिनी जनमनावर नेहमींच पडत असते. त्यांच्या प्रतिभेचीं प्रतीकें म्हणून गीता प्रवचनें, मधुकर आणि भू-दानावरचीं शेंकडों पुस्तकें अंगुली-निर्देश करून दाखवितां येतील.

विनोबाजींची अलिकडील थोर कामगिरी म्हणजे भू-दान आंदोलन होय. या आंदोलनाकडे सर्व जग पाहात आहे. अनेक परकीय तज्ञ या आंदोलनाचा काळजीपूर्वक अभ्यास करीत आहेत.

सध्यां भारतांत जमीनीचा प्रश्न सोडविणें अत्यंत अगत्याचें असून तो तितकाच गुंतागुंतीचाहि आहे. विनोबाजी म्हणजे विद्वत्ता व करुणा यांचा मूर्तिमंत संगम! त्यांच्या चौकस बुद्धीच्या चौकटींतून हा प्रश्न कसा निसटेल?

कम्युनिस्टांनीं चिथाविलेल्या तेलंगणांत अस्थिरता निर्माण झाली होती. अनेक खून पडले होते. एक प्रकारचें दहशतवादी हिंसक वातावरण तयार झालें होतें.

विनोबाजी शांतता प्रस्थापित करण्यासाठीं तेलंगणांत पायीं फिरत होते. आपल्या पावन वाणीनें मत्सरतेची विषारी हवा शुद्ध करीत होते.

नळगोंडा जिल्ह्यांतील पोचमपली गांवीं ते आले. दुपारीं हरिजन त्यांना भेटले. त्यांनीं आपलें अंत:करण उघडें केलें!

विनोबाजींना त्यांची भूक समजली. त्यांचे खोल गेलेले डोळे व खोपाट झालेलें पोट पाहून त्यांना गहिंवरून आलें.

हरिजनांना ८० एकर जमीनींची आवश्यकता होती. तेथें जमलेल्या लोकांना त्यांनीं सहज विचारलें, "सरकारकडून जर लवकर जमीन मिळूं शकली नाहीं तर आपल्यापैकीं कोणी यांना जमीन देईल का?"

रामचंद्र रेड्डीच्या रुपानें मानवी हृदयांत असलेला सुप्त चांगुलपणा तत्क्षणीं प्रकटला ! त्यांनीं १०० एकर जमीन हरिजनांना भेट म्हणून दिल्याचें जाहीर केलें.

विनोबाजींच्या मनावर या घटनेचा खोलवर परिणाम झाला. तेलंगणांतील अडीच महिन्याच्या दौऱ्यांतील काळांत त्यांनीं खूप विचार केला.

१९५१ च्या सप्टेंबरमध्यें, पंडितजींच्या निमंत्रणावरून दिल्लीला योजना समितीच्या सभासदाशीं पंचवार्षिक योजनेसंबंधीं चर्चा करावयाला ते पायींच निघाले ! पवनार पासून दिल्लीपर्यंतच्या प्रवासांत विनोबांना हजारों एकर जमीन दान म्हणून मिळाली.

विनोबाजींच्या या भू-दान आंदोलनांत जयप्रकाशजी स्वतः जीवन-दान जाहीर करून सामील झाले. भू-दान आंदोलनाचें स्वरूप विशाल झालें. भू-दान, संपत्ति दान, ग्राम-दान, जीवन-दान, असें त्या आंदोलनाला नवस्वरूप प्राप्त झालें.

विनोबांनीं जनतेसमोर सर्वोदय पात्राची योजना ठेवली आहे. ते म्हणतात, "प्रत्येक कुटुंबांतील एका लहानांतल्या लहान मुलाच्या मुठीनें मूठभर धान्य दररोज भोजनापूर्वीं एका पात्रांत टाकण्यांत यावें. ज्या समाजांत आपण जन्मास आलों त्या समाजास आपण कांहीं तरी दिलें पाहिजे असा संस्कार बालमनांवर नित्य व्हावा हाहि एक हेतु बालमनाच्या मुठीनें धान्य त्या पात्रांत टाकण्यांत आहे."

विनोबाजी वेदवाणी बोलत आहेत. आजपर्यंतच्या संत–महर्षींचा वारसा घेऊन ते आले आहेत. अध्यात्म्याची जोड विज्ञानाशीं घालून तें विश्व कल्याणाची चिंता वाहात आहेत.

त्यांच्या पावन वाणीनें जगांतील विद्वानांचे डोळे उघडतील व माणसाला माणुसकीनें वागविणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे असें सर्व मानतील अशी आशा करणें व्यर्थ ठरणार नाहीं असें वाटतें.

*   *

# थोरांचे अभिप्राय

जिल्हा स्कूल बोर्डांचे एक ध्येयवादी शिक्षक श्री. सि. मा. रानगे यांनीं लिहिलेलीं संत चरित्रें वाचलीं. संस्काराच्या दृष्टीनें तीं लहान मुलांच्या हातांत वाचनासाठीं देण्यास योग्य आहेत. कथा स्वरुपांत चरित्रें लिहिण्याचा श्री. रानगे यांचा प्रयत्न यशस्वी व अभिनंदनीय आहे यांत शंका नाहीं.

भावना व विचार यांचा समतोलपणा, महत्त्वपूर्ण प्रसंगांची निवड व त्यांची कलात्मक मांडणी, साधीसोपी भाषा यामुळें चरित्रें वाचनीय व माहितीपूर्ण झालीं आहेत. या लेखकाच्या कळकळीच्या प्रयत्नाचें सार्वत्रिक स्वागत होईल अशी मला आशा आहे.

मी लेखक श्री. रानगे यांना सुयश चिंतितों.

D. N. Nikam
चेअरमन
डि. स्कूलबोर्ड, कोल्हापूर.

★ ★

' माझे संत ' हें वाङ्मयपुष्प श्री. रानगे उमलवीत आहेत याबद्दल मला अतिशय आनंद वाटतो. या कलिकेच्या परिमळाचा आस्वाद मी ओझरता घेतला आणि मला तो आवडला.

प्रत्येक पुष्पाला निसर्गानें भिन्न रंग, भिन्न रूप, वेगळा गंध दिला आहे. आणि त्या प्रत्येकाचें महत्त्व वेगवेगळें आहे.

श्री. रानगे यांचें ' माझे संत ' हें पुष्पहि आपल्या खास वैशिष्ठ्यानें असेंच सुंदर आहे.

एक प्राथमिक शिक्षक आपला व्यवसाय सांभाळून शक्य तेवढें अध्ययन करून वाङ्मय क्षेत्रांत आपली एक छोटीशी कलाकृति सादर करितो अशी या पुस्तक-लेखनाची पार्श्वभूमी आहे.

भारतीय संस्कृतीचा आधारभूत पाया जो संतवृत्ति त्याचें दर्शन आपल्या भाषेंत देण्याचा प्रयत्न हें या पुस्तकाचें वैशिष्ठ्य आणि आजच्या भारतीय समस्या-पूर्तीसाठीं आवश्यक असणारें साध्य, साधन व साधनाचा शोध संतवाङ्मयांतून घेण्याचा व अनेकांना देण्याचा प्रयत्न हें या पुष्पाचें सौंदर्य आहे.

निरनिराळ्या ठिकाणच्या आकर्षक कथा, गोष्टी आणि वर्णनांचा संग्रह व त्यांतून निर्माण झालेले विविधरुपी सुगंध हें या छोट्या पुस्तकाचें अंतरंग आहे.

विशेषत: वाङ्मयीन क्षेत्रांत एखादी कलाकृति सादर करणें ही गोष्ट जाडा व्यासंग, लांबलचक पदव्या, आणि विशिष्ट दर्जा असणाऱ्याचें काम अशी सामान्यत: लोक-समजूत असतांना यांपैकीं ज्यांचे वाव्यास कांहींच नाहीं अशा श्री. रानगे यांनीं केलेल्या महत्त्वाकांक्षी धाडसांत या पुष्पाचें झेपदार आगमन आहे......... ग्रामीण वाचक आणि विशेषत: बालक नि प्रौढ साक्षरांना तें आवडेल असें मला वाटतें.

**दिनकरराव मुद्राळे**
चिटणीस, जिल्हा विकास मंडळ, कोल्हापूर

★ ★

'**माझे संत**' या पुस्तकाचे लेखक श्री. सि. मा. रानगे यांना मी एक ध्येयवादी व निष्ठावंत शिक्षक म्हणून ओळखतो.

त्यांचा हा प्रयत्न साहित्य-क्षेत्रांतील पहिलाच असून देखील तो फारच यशस्वी झालेला आहे. मी या पुस्तकाचें हार्दिक स्वागत करतों.

शालेय विद्यार्थ्यांना व प्रौढ साक्षरांना महान् संतांची ओळख व्हावी, त्यांच्या थोर कार्यांची त्यांना माहिती मिळावी आणि त्यांचे थोर आदर्श त्यांच्या समोर ठेवावेत या उद्देशानें प्रेरित होऊन लेखकानें हें पुस्तक लिहिलें आहे. अत्यंत सोप्या भाषेंत व कांहीं लेख तर एकहि जोडाक्षरांचा वापर न करतां लिहिण्याचा उपक्रम उल्लेखनीय असा आहे.

हें पुस्तक वाचून विद्यार्थ्यांचीं संस्कारक्षम मनें सुसंस्कृत होतील असा विश्वास वाटतो.

महाराष्ट्रांतील विद्यार्थी, नव-प्रौढसाक्षर व शिक्षणप्रेमी जनता या पुस्तकाचें स्वागत करतील अशी माझी खात्री आहे.

प्रस्तुत लेखकाकडून अशा प्रकारचें साहित्य पुन:पुन्हा निर्माण होवो अशी अपेक्षा व्यक्त करून लेखकाला सुयश चिंतितो.

प्रो० **सच्चिदानंद शिरोडकर**, एम्. ए.
गोपाळकृष्ण गोखले कॉलेज,
कोल्हापूर.

REFBK-0014434

★

बहुजन समाजांतील एक ध्येयवादी आणि कर्तव्यनिष्ठ प्राथमिक शिक्षक श्री. सि. मा. रानगे यांनीं 'माझे संत' या पुस्तकाद्वारें प्राचीन व अर्वाचीन अशा थोर निवडक संतांचा परिचय अत्यंत सुगम भाषेंत करून दिला आहे. आधुनिक भारताच्या नवसमाज निर्मितीच्या कार्यांत चारित्र्याला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. या दृष्टीनें श्री. रानगे गुरुजी यांनीं विद्यार्थी आणि प्रौढ नवसाक्षरांच्यापुढें थोर संताचे आदर्श ठेवण्यांत औचित्य साधलेलें आहे. ओघवती भाषा आणि आकर्षक कथनशैली यामुळें हे पुस्तक विद्यार्थी आवडीनें वाचतील अशी अपेक्षा आहे.

श्री. रानगे गुरुजी यांच्याकडून अशीच उत्तरोत्तर उज्ज्वल वाङ्मय सेवा घडो अशी सदिच्छा व्यक्त करतो.

**आर. आर. जाधव**
असि. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर,
जिल्हा स्कूलबोर्ड, कोल्हापूर.

★ ★

श्री. सि. मा. रानगे यांचें 'माझे संत' हें पुस्तक वाचलें. हें पुस्तक म्हणजे बहुजन समाजांतील अगदीं खालच्या थरापर्यंत शिक्षणानें कोणते सुसंस्कार घडतील या आशेचा अंकुरच होय. पू. साने गुरुजींच्या धडपडणाच्या मुलाच्या तळमळीनें त्यांच्या जीवनांत संतवाङ्मयाची अधिकाधिक सेवा घडो.

**प्रा. एम्. आर. राऊत**
बी. ए. ऑ. डी. बी. एड्.
ताराराणी अध्यापिका विद्यामंदिर,
कोल्हापूर.

—०—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम........................ वि: ...............
क्रमांक ........................ नोंद दि: ...........

माझे संत भाग १ ला

१ जानेवारी १९६०

: प्रमुख विक्रेते :

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

व

विविध वस्तु भांडार, गडहिंग्लज.

: आगामी प्रकाशन :

माझे संत भाग २ रा

आवडत्या कथा भाग १ ला

,, ,, ,, २ रा